**कर्मचारी भरपाई आयुक्त, मुंबई यांच्या आस्थापनेवरील ७ अस्थायी पदे दि. १.३.२०२४ पासून दि. ३१.०८.२०२४ पर्यंत पुढे चालू ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**शासन निर्णय क्र. औन्यामुं-०२२४/प्र.क्र.३०/ काम-६**
मंत्रालय, मुंबई -४०० ३२.
दिनांक :- ६/३/२०२४

**वाचा :** १) उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.औन्यामुं-०१२२/प्र.क्र.०९/काम-६, दि. २१/०९/२०२३.

२) प्रबंधक, औद्योगिक न्यायालय, मुंबई यांचे पत्र क्र. औन्यामुं/आस्था-१/४२५९, दि. २२/१२/२०२३.

३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क. दि.२१.०२.२०२४

**शासन निर्णय:-** या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्र “अ” मध्ये दर्शविलेली अध्यक्ष, औद्योगिक न्यायालये, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या प्रशासकीय अधिपत्याखालील कर्मचारी भरपाई आयुक्त कार्यालयातील एकूण ७ अस्थायी पदे दि. १.३.२०२४ पासून दि. ३१.०८.२०२४ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासन मंजूरी देण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग मागणी क्रमांक “ के-४, लेखाशीर्ष २२३०, कामगार व सेवायोजन - ०१- कामगार १११ , कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता, (००) (०१) कर्मचारी भरपाई अधिनियमाखाली आयुक्त (२२३० ०५९५), (०१) वेतन (योजनेतर) ” खाली खर्ची टाकून तो सन २०२४-२०२५ या वित्तीय वर्षासाठी मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

३. वित्त विभागाच्या शा.नि.क्रमांक-पदनि-२०१६/ प्र. क्र.०८/१६/आ.पु.क. दि. २१ फेब्रुवारी, २०२४ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन तसेच, उद्योग ऊर्जा व कामगार विभागाच्या शासन निर्णय क्र.आयसीई-११०३/प्र.क्र.९१७८/काम-६ दिनांक १८/०८/२००४ मधील तरतुदीनुसार हा शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०३०६१५४८११३०१० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

DEEPALI UPENDRA JAPE

Digitally signed by DEEPALI UPENDRA JAPE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR DEPARTMENT,
2.5.4.20=735d6d81d9099a643dc5a1e7e261a6ea60ad4418817bd25d02db4654ea8c8e11,
postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=F1EDA6DD54D9C1D002A33252AA96B6C559E22C914431F772457B39E98A5FCEAC, cn=DEEPALI UPENDRA JAPE
Date: 2024.03.06 15:57:12 +05'30'

( दीपाली जपे )
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

अध्यक्ष, औद्योगिक न्यायालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई,

प्रबंधक, औद्योगिक न्यायालये, मुंबई
कर्मचारी भरपाई आयुक्त, मुंबई
महालेखापाल-१/२ (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र मुंबई.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
वित्त विभाग (व्यय-१६)/(आ.पु.क.),मंत्रालय,मुंबई.
कार्यासन-प्रशासन-१ उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती (कामगार-६)

## विवरणपत्र - अ

शासन निर्णय ,उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. औन्यामुं-०२२४ /प्र.क्र.३०/ काम-६
दिनांक :- ६/०३/२०२४
(कर्मचारी भरपाई आयुक्त कार्यालय, मुंबई येथील अस्थायी पदे दि. १.३.२०२४ पासून दि. ३१.०८.२०२४ पर्यंत पुढे चालू ठेवण्यासंबंधीचे विवरणपत्र )

| **पदनाम** | **पदांची संख्या** |
|---|---|
| १ | २ |
| **अराजपत्रित वर्ग - ३** | |
| न्यायालय लिपिक | १ |
| लघुलेखक (नि.श्रे.) | १ |
| रोखपाल | १ |
| लिपिक टंकलेखक | १ |
| बेलिफ | १ |
| **अराजपत्रित वर्ग - ४** | |
| शिपाई | २ |
| **एकूण** | ७ |

DEEPALI UPENDRA JAPE

Digitally signed by DEEPALI UPENDRA JAPE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=INDUSTRY ENERGY AND LABOUR DEPARTMENT, 2.5.4.20=735d6d81d9099a643dc5a1e7e261a6ea60ad4418817bd25d02db4654ea8c8e11, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F1EDA6DD54D9C1D002A33252AA96B6C559E22C914431F772457B39E98A5FCEAC, cn=DEEPALI UPENDRA JAPE
Date: 2024.03.06 15:57:36 +05'30'

( दीपाली जपे )
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन